# प्रकरण पहिले

## मा. दे.भ.डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे बालपण, शिक्षण

## आणि स्वातंत्र्य लढ्यामध्ये

## सहभाग

## प्रकरण पहिले

## मा.दे.भ.डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे बालपण, शिक्षण आणि स्वातंत्र्य लढयामध्ये सहभाग

### प्रस्तावना

हिंदुस्थान ही एक महापुरुष रत्नांची खाण आहे. अनेक लोकोत्तर पराक्रमी राष्ट्रपुरुषांनी हिंदुस्थानचा इतिहास घडविला. दिडशे वर्षे ब्रिटिशांच्या राज्यसत्तेखाली हिंदुस्थान देश गुलाम झाला. या शक्तीशाली राष्ट्रास हातकडया व पायात बेडया घालून जायबंद केले. या दिडशे वर्षांचा क्रांतीकारकांचा इतिहास सोनेरी अक्षराने लिहून ठेवावा असाच आहे. युगनिर्माते छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भाग्यवंताची भूमी, रणरागिणी ताराराणी यांची राजधानी आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक, शैक्षणिक यांचा वारसा सांगणारी कर्मभूमी, आपल्या पराक्रमाने स्वातंत्र्य संग्रामात अमर झालेले स्वातंत्र्यसेनानी या भूमीत हजारो युगपुरुष झुंझार, क्रांतीवीर, कर्तबगार, कर्मवीर, समाजधुरीण, सहकार महर्षी, शिक्षण महर्षी, संत महात्मे म्हणवून घेणा-या थोर लोकांचा जन्म झाला. असा हा महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा सर्वार्थाने कर्तृत्ववान जिल्हा म्हणून ओळखला जातो.

कोल्हापूर जिल्हयात श्री छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यातून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार या काळात वाढत चाललेला होता, यामुळे नवी पिढी जागृत होत चालली होती. त्यानंतर श्री राजाराम महाराजांच्या काळातसुध्दा म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशभरात स्वातंत्र्य आंदोलनाची चळवळ जोमाने वाढत होती.

कोल्हापूर संस्थानात देखील या चळवळीचे वारे पसरलेले होते. कॉंग्रेसचा प्रत्यक्ष संस्थानात हस्तक्षेप नसला तरी त्या विचारांने प्रभावित झालेले कार्यकर्ते स्वातंत्र्य चळवळीचे कार्य करीत होते. तसेच याच करवीर संस्थानात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय परिवर्तनाचे कार्य सुरु होते.

अधिक विधायक स्वरुपाची राष्ट्रीयता, डिप्रेस्ड क्लासेस मिशन सेवासदन, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी, सोशल सर्व्हिस लीग वगैरे सर्व राष्ट्रभर पसरणाऱ्या प्रागतिक संस्थांच्या रुपाने उदय पावू लागली होती. महात्मा गौतमबुध्द, तिर्थंकार भगवान महावीर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फूले, महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धोंडो केशव कर्वे, लोकहितवादी गोपाळराव देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील इत्यादी समाजसुधारकांनी महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात महत्वाची कामगिरी बजावली.

देशात स्वकीय व परकीयांचा जो या संस्थानात धुमाकूळ चालला होता, त्याची खरी कहाणी मार्मिकपणे सांगेल तर अंगावर शहारे आल्याशिवाय राहाणार नाहीत. म. गांधीजींच्या राजकीय व राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात रत्नाप्पाण्णा कुंभार कार्यकर्ता म्हणून सहभागी झाले.

राष्ट्रीय स्तरांवर स्थापन झालेल्या संस्थानात असलेल्या जनतेच्या प्रतिनिधींची संघटना स्थापन होऊन अ.भा. संस्थानिक सभा या नावाने कार्य सुरु होते. याच काळात जबाबदार शासनपध्दती अंमलात आणावी, मुद्रण व भाषण, स्वातंत्र्य मिळावे या सारख्या मागण्यासाठी "प्रजापरिषद"

संघटनेचे नेतृत्व भाई माधवराव बागल व रत्नाप्पाण्णा कुंभार या प्रमुख नेत्यांनी केले. "प्रजापरिषद" या चळवळीचे संघटक म्हणून रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे नेतृत्व पुढे आलेले दिसते. प्रजापरिषदेद्वारा महाराष्ट्रात आंदोलन चळवळ करीत असताना रत्नाप्पा कुंभारांच्या दृष्टीसमोर ज्या प्रेरणा होत्या त्या विचारांच्याच दिशेने समाजाची नव्याने बांधणी करण्याचे स्वप्न रत्नाप्पाण्णा कुंभार पहात होते.

कोल्हापूर जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या जनआंदोलनात रत्नाप्पाण्णा कुंभारांनी सक्रिय सहभाग घेऊन चळवळीला एक निश्चित दिशा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचाही विचार या शोध-निबंधात करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या नेतृत्वासंबंधी सर्वांगिण अभ्यास व्हावा हा मुख्य हेतू समोर होता. रत्नाप्पाण्णा कुंभारांच्या राजकीय जीवनाचा अभ्यास करीत असताना त्या काळातील सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास होतो व त्यातून झालेल्या विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास केला आहे.

"मा.दे.भ.डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार आणि राजकीय नेतृत्व" एक अभ्यास या शोध निबंधाचा अभ्यास करताना त्या काळातील सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिती कशी होती, त्यांचे बालपण, शिक्षण आणि स्वातंत्र्य लढयामधील त्यांचा सहभाग व प्रजापरिषद चळवळीतील तसेच भूमिगत चळवळीतील त्यांचे योगदान, सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान, शिक्षण क्षेत्रातील त्यांची कामगिरी, रत्नाप्पाण्णांचे राजकीय विचार व राज-कारणातील त्यांचे योगदान व त्यांचे राजकीय नेतृत्व यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

वरील उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा संशोधनासाठी वापर केलेला आहे. ऐतिहासिक कागदपत्रे, वृत्तपत्रे, शासकीय व निमशासकीय प्रकाशने, नियतकालिके, ग्रंथालये, पुस्तके, अप्रकाशित व प्रकाशित शोधनिबंध, पत्रके या साधनांचा उपयोग यात केलेला आहे.

## जन्म व बालपण

दलदलीत आणि चिखलातच कमळाचे फूल जन्माला येते. कोल्हापूरची माती अनेक नवरत्नांना आपल्या कुशीत जन्माला घेऊन आली आहे. कोल्हापूर ही कलावंत, रसिक, वीर, शूर, धाडशी आणि देशप्रेमी जनांची जननी, जन्मभूमी आहे. "राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी सुमारे ७० वर्षापूर्वी कोल्हापूर जिल्ह्याने भारताला एक तेजस्वी क्रांतीकारक नेता दिला. या महामानवाचे नाव आहे दे.भ. पद्मश्री "डॉ. रत्नाप्पा कुंभार". [१] संपूर्ण महाराष्ट्र त्यांना "आण्णा" म्हणून ओळखतो.

करवीर नगरी आणि तिचा परिसर जसा मल्ल विद्येसाठी प्रसिध्द आहे, तसाच तो झुंझार लढवय्या योध्दयाचाही प्रदेश म्हणून इतिहास प्रसिध्द आहे. या भूमिने अवघ्या देशाला ललामभूत ठरणारा शाहू महाराजांसारखा दैदिप्यमान हिरा या देशाला दिला. त्याच या भूमिने स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी आणि स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यासाठी नवरत्न जन्माला घातले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणाची पर्वा न करता अहोरात्र रानावनातून जीवन कंठून, प्रसंगी दिवस-दिवस उपाशी पोटी कर्तव्यनिष्ठेशी ईमान राखून तर स्वातंत्र्यानंतर गोरगरीबांच्या कल्याणा-साठी सातत्याने परिश्रम घेऊन, विचारशक्ती आणि कार्यक्षमतेला चिरंतन देशभक्तीची जोड देणारे आदर्श क्रांतीकारी व्यक्तिमत्व निर्माण केले रत्नाप्पा कुंभार.

"कोल्हापूर जिल्ह्यात शिरोळ तालुक्यातील निमशिरगांव या लहान खेड्यात व्यवसायाने कुंभार असणा-या कुटुंबात १५ सप्टेंबर, १९०९ रोजी रत्नाप्पाण्णा हे जन्मास आले. यांचे वडिल श्री. भरमाप्पा व आई सौ. गंगुबाई." [२] "निमशिरगांवच्या कुंभारवाड्यात भरमाप्पा व गंगुबाई यांचे हातावर पोट असलेले कुटुंब, गाडगी, मडकी तयार करावयाचे, बाजारात विकावयाचे आणि त्यावर गुजराण करावयाचे असा हलाखीचा संसार." [3] रत्नाप्पाण्णांनी "माझा जन्म शेताच्या पाल्याच्या खोपीत झाला."[४] त्यावेळी गावात रोगाची साथ होती. म्हणून त्यांचे आई-वडिल गाव सोडून शेतात रहात होते.

"गरीबाघरी जन्म घेतला तरी पोर लखलखीत रत्नासारखे दुनियेत चमकावे हे स्वप्न उराशी बाळगून भरमाप्पाने त्यांचे नाव "रत्नाप्पा" ठेवले." [५] "वयाच्या सातव्या वर्षी आईच्या वात्सल्यास रत्नाप्पाण्णा मुकले." [६] "त्यांची एकुलती एक बहिण तिच्या वयाच्या १९ व्या वर्षी विवाहानंतर देवाघरी गेली." [७] रत्नाप्पांचा सर्व सांभाळ, संस्कार आणि त्यांचे शिक्षण त्यांच्या वडिलांनी केले. आण्णांच्या वडिलांनी केलेला त्याग अलौकिक आहे. तरुण वयात पत्नी वारल्यानंतर रत्नाप्पाण्णांचे आबाळ होऊ नये, म्हणून "त्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न न करता स्वत: जेवण करुन वाढविले." [८]

आई-वडिलांच्या काळजाचा तुकडा असलेल्या रत्नाप्पांनी बाळसं धरायच्या आतच त्यांना आईच्या सुखाला पारखं व्हाव लागलं. मुलाला कोडकौतुकानं वाढवाव, मोठा झालेला पहावे हे सुख गंगुबाईच्या नशिबी नव्हतच. ती जग सोडून गेली. मग भरमाप्पालाच आई आणि बाप अशी दुहेरी कामगिरी पार पाडावी लागली. आपल्या नशिबी जरी आईच्या

माया ममतेचं छत्र नसलं तरी देशातील असंख्य दीनदुबळ्या, गोरगरीबांना तळागाळातल्या पददलितांना आयुष्यभर आपल्या सेवाभावी वृत्तीचे जिव्हाळ्याचे छत्र मात्र पुढील आयुष्यात रत्नाप्पाण्णांनी घायचे व्रत घेतले. अत्यंत जिद्दीने आणि मनापासून या लोकांच्या पालकत्वाचा वसा म्हणून त्यांनी स्वीकारला. भरमाप्पांनी मातीला आकार देताना आपल्या मुलाची सांस्कृतिक जडण घडण अशी तयार केली. मुलगा शिकून मोठा व्हावा म्हणून पोटाला चिमटा काढून रत्नाप्पाला शाळेत घातला. घरी गरीबी असली तरी वडिलांनी गावासाठी काम केले होते. अनेकांशी नाती जोडली होती, त्यामुळे त्यांना गावात मान आणि प्रतिष्ठा होती. लोकोपयोगी कामाची आवड आण्णांना त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली होती.

आईची माया फार काळ न लाभलेली व्यक्ती प्रेमाने विव्हळत असतात असे काही मनोवैज्ञानिक म्हणतात. सर्व समाजकंटाकांना प्रीती-विरहीत बालपण लाभत असते, असे सर्वसामान्य जनतेचे मत असते. परंतु रत्नाप्पाण्णांच्या बाबतीत हा समज खोटा आहे. त्यांना मातृ वात्सल्य नसले तरी पितृ वात्सल्य पुरेसे मिळालेले आहे. असे समाधान काहींना वाटेल. एकंदरीत वडिलांच्या प्रेमाच्या पंखाखाली रत्नाप्पाण्णांनी आपले बालपण घालविले आहे.

## शिक्षण

जन्मतःच कुशाग्र बुध्दीमत्ता, शिक्षणाची विलक्षण आवड त्यामुळे प्रत्येक इयत्ता विनासायास ओलांडत प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. रत्नाप्पांण्णांचे प्राथमिक शिक्षण आपल्या जन्मगावीच पूर्ण झाले. पुढे शिकण्याची जिद्द

मात्र गप्प बसू देईना. घरी अतिशय गरीबी असूनही ते दररोज निमशिरगाव ते हातकणंगले असे सात-आठ मैलाचे अंतर पायी चालून जात आणि हातकणंगले येथून रेल्वेने कोल्हापूरला जात अशी वणवण करुन हालअपेष्टा सोसून त्यांनी आपले हायस्कूलपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. "१९२८ साली ते मॅट्रीक झाले." [९]

माध्यमिक शिक्षण संपल्यानंतर आण्णा कॉलेज शिक्षणासाठी कोल्हापूरास आले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थीगृहे शिक्षणासाठी कोल्हापूरास येणा-या विद्यार्थ्यांसाठी मोफत राहण्याची व जेवणाची सोय केली होती. इतकेच नव्हे तर हुशार विद्यार्थ्यांसाठी त्यांनी प्रोत्साहन मिळावे म्हणून शिष्यवेतनाची सोय त्यांनी केली होती."कोल्हापूरच्या वसतिगृहात जिद्द व कष्टाळू वृत्तीने त्यांना शिष्यवृत्ती मिळू लागली होती." [१०] "आण्णा ईंटर मेजिएटला असताना अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या अधिवेशनास गेले होते. त्यामुळे १९२९-३० या वर्षी त्यांचे एक वर्ष परीक्षा न दिल्याने वाया गेले." [११] कोल्हापूरमधील महाराजांच्या विरशैव हॉस्टेलमध्ये राहून, "राजाराम कॉलेजमधून रत्नाप्पाण्णांनी बी.ए. ही पदवी संपादन केली." [१२] बी.ए. ही पदवी संपादन केल्यानंतर आण्णांनी एलूएल्.बी. चा अभ्यास सुरु केला. मुलगा अध्ययन करत असल्याचे पाहून त्यावेळच्या रितीरिवाजाप्रमाणे त्यांचे वडील भरमाण्णा यांनी आपल्या मुलांसाठी कन्या ठरवून मिरज तालुक्यातील गुंडेवाडी येथील पार्वतीबाई हिच्याबरोबर विवाह केला." [१३]

"रत्नाप्पाण्णा कोल्हापूरच्या चित्रदुर्गमठात राहात होते." [१४] त्यावेळची एक आठवण सांगितली जाते, "१९३५ मध्ये आण्णा विरशैव बोर्डींगचे सुपरिंडेंट होते." [१५] या बोर्डींगच्या रौप्य महोत्सवात आण्णांनी

९ वर्षांच्या कुमार गंधर्वना पाचारण केले होते. त्यावेळी कुमारांचा कोल्हापूरात एक महिना मुक्काम होऊन त्यांचे बालवयात नाव झाले होते. वसतिगृहात "रत्नाप्पाण्णा नित्य नियमाने सुतकताई करीत."[१६]

१९३४ च्या सुमारास भाई माधवराव बागल यांना कोल्हापूरातील प्रख्यात लढवय्ये, स्वातंत्र्यसेनानी म्हणून ओळखले जात होते. प्रजापरिषद नावाच्या संघटनेचे नेतृत्व सांभाळणा-या बागल यांच्या आदर्शाकडे रत्नाप्पाण्णा आकर्षित झाले व त्यांचे "सक्रिय सभासद झाले." [१७] याबाबत स्वत: भाई माधवराव बागल यांनी "रत्नाप्पा आणि मी" हा लेख लिहून त्यात म्हणतात, "श्रेष्ठी वकिलांच्या घरी माझी व रत्नाप्पा कुंभार या पदवीधर तरुणाची प्रथम गाठ पडली व हा तरुण कायदेभंगाच्या यादीत नाव देण्यास तयार होईल काय ? म्हणून विचारुन पाहिले, त्याने लगेच संमत्ती दिली. इतर अनेकांनी आयत्यावेळी माघार घेतली. पण रत्नाप्पांनी वचन दिले व चळवळीला मूर्त स्वरुप येऊन यश मिळेपर्यंत अत्यंत निष्ठेने अगदी आपलाच प्रश्न समजून सहकार्य दिले. मी प्रचारक व रत्नाप्पा संघटक अशी ही आमची जोडी सख्या भावाप्रमाणे नव्हे भावा-हूनही एकजुटीने राजेशाही विरुद्ध लढली. प्रजापरिषदेला जे परिणाम-कारक स्वरुप मिळाले, संस्थानची सर्व खेडो-पाडी जागी झाली व सरकार विरुद्ध जनतेची प्रभावी फळी उभी राहिली, ती माधवराव बागलांच्या प्रचारामुळे व रत्नाप्पाण्णांच्या संघटना कौशल्यामुळे." [१८]

दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांनी प्रजापरिषदेचे पहिले अधिवेशन कुपवाडच्या माळावर दे.भ. डॉ. पट्टभिसितारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली १९३५ साली पार पाडले. त्यावेळी अध्यक्ष "डॉ. पट्टभिसितारामय्यांचे भाषण इंग्रजी-मध्ये झाले, त्याचा अनुवाद मराठीत दे.भ. रत्नाप्पा कुंभारानी केला. ते डॉ.पट्टभिसितारामय्यापेक्षा जास्त परिणामकारक असे झाले."[१८-अ]

"रत्नाप्पाण्णा यांनी एलएल्.बी. चे पहिले वर्ष पूर्ण केले." [१९] त्यांनी वकीली करावी अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. पण विधिलिखीत वेगळेच होते. आण्णा भाई माधवराव बागल यांनी सुरू केलेल्या राजकीय चळवळीकडे वळले आणि इथेच त्यांच्या जीवनातील नव्या कालखंडास सुरुवात झाली. रयतांची संघटना करून सभा, मेळावे भरवून विविध मोर्चे काढून "ब्रिटिशांना तोंड देण्याचा प्रयत्न म्हणून त्यांनी १९३७ व १९३८ मध्ये जनमोर्चे संघटित केले." [२०] "इ.स. १९३६ ला फैजपूर-च्या काँग्रेसला एक राष्ट्रप्रेमी म्हणून आण्णा हजर राहिले." [२१] "त्यावेळी महात्मा गांधीजींच्याकडून खादीची दिक्षा घेऊन अन्यायाच्या विरुध्द पेटून उठण्यासाठी आण्णा कटिबध्द झाले." [२२]

## व्यक्तिमत्त्व

रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचे विचार कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. साधी राहणी, उच्च विचारसरणी ही गांधीजींची शिकवण त्यांनी आपल्या जीवनात अंगिकारलेली दिसते. आण्णांच्या व्यक्तिमत्वाची छाप समोरच्या माणसावर पटकन पडते. त्यांचे महत्वाचे कारण म्हणजे आण्णांचे बोलणे, मनमिळावू स्वभाव, शिस्त, स्वच्छता व राहणीतील साधेपणा, त्यांचा पेहराव अगदी साधा आहे. आण्णा गांधीजींच्या सारखेच अजूनही पंजा नेसतात. अंगात सदरा व डोक्यावर टोपी शुभ्र पांढऱ्या रंगातील खादीच्या कपडयातील आण्णा साध्या सरळ स्वभावाचे आहेत. आण्णांचा रंग गोरा, नाक सरळ, लांब, उभट चेहरा, भव्य कपाळ, उंच व सडपातळ बांधा असला तरी शरीर व्यायामाने कमावलेले दिसते. त्यांचा चेहरा सदैव हासरा, मन खोल कांहीतरी विचारात असल्यासारखे चिंतनशील, बाणा मात्र करारी, कांहीतरी नवीन-

नवीन करून दाखविण्याची आण्णांची उमेद, धडाडी त्यांना आजही स्वस्थ बसू देत नाही. अठरा वर्षांच्या युवकाला लाजवेल अशी धाडशी वृत्ती आजही वयाच्या ८७ व्या वर्षी आण्णांच्यात दिसते. गोरगरीबांच्या बद्दलची कणवाळू, दयाळूवृत्ती आण्णांच्यात दिसते. त्यांच्या बोलण्यातून, लिखानातून नेहमीच दारिद्र्यात खितपत पडलेल्या जनतेबद्दलची कणव दिसून येते. आण्णांचा लोकसंग्रह अफाट आहे. जे-जे आण्णांना भेटले, भेटणाऱ्यांचे मनोमनी स्वागत करतात. त्यांच्या संपर्कात आले ते सर्व त्यांचेच झाले. आण्णा अजात शत्रू आहेत. सत्तेच्या राजकारणासाठी व अधिकारपदाच्या हव्यासापोटी अलिकडच्या काळात काही विरोधक निर्माण झालेले दिसतात. पण आण्णांच्या उत्तुंग व्यक्तीमत्वामुळे, मुत्सद्दी राजकारणामुळे सर्व विरोधक थिटे पडलेले दिसतात. अलिकडेच झालेल्या पंचगंगा निवडणुकीत आण्णांनी विरोधकांचे अक्षरश: पाणीपत करून टाकले. पंचगंगेच्या परिसरात असलेल्या शिरोळ व हातकणंगले या तालुक्यातील गांवामधील ग्रामपंचायतीत आण्णांचे वर्चस्व आहे. तसेच शिरोळ व हातकणंगले तालुका पंचायत समित्या आण्णांच्या बाजूनेच आहेत. साध्या पतसंस्थेच्या निवडणुकीपासून थेट खासदारकीच्या निवडणुकीपर्यंत आण्णांचा विचार, आशिर्वाद घेतल्याशिवाय एकही पान हालत नाही, असे चित्र कोल्हापूर जिल्हयात आजही दिसते. आण्णांचे त्यावेळचे त्यांचे सहकारी, त्यांचे मित्र आजही भेटल्यानंतर आण्णांच्या केलेल्या कामाबाबत आपआपसात चर्चा करीत असताना दिसतात व आण्णांचे आपण एक सहकारी म्हणून धन्यता मानतात, आण्णांच्या मनातही त्यांच्याबद्दलचा जिव्हाळा, उत्कंठा तीव्रतेने जाणवते.

आण्णांचा एक गुणविशेष म्हणजे पत्र मैत्री होय. आण्णांना कोणाचेही सामान्य शेतक-यांचे, कार्यकर्त्यांचे जरी पत्र आलेतरी त्यांचे उत्तर आण्णा हमखास देणार. त्यांची पत्रमैत्री वाखानन्यासारखी आहे.

रात्र-रात्र जागून आण्णा पत्रे लिहितात. त्यांच्या साध्या राहणी-पणाने व भक्कम आर्थिक उपक्रमाचे समर्पक उदाहरण म्हणजे श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर, इचलकरंजी होय. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याजवळ सहज फिरत गेला तरी साध्या पत्र्याच्या इमारती नजरेस पडतात. आर.सी.सी., उंच-उंच इमारती, झगमगाट या परिसरात दिसत नाहीत. भक्कम, टिकाऊ पत्रे साध्या प्रकारच्या इमारती मनं आकर्षून घेतात. कापडाच्या साध्या कनातीचे, पडद्याचे शामीयाने मंडप दिसतात. आजही आण्णा एकवेळच जेवतात. लोकशाही समाजवादी विचारसरणी आण्णांच्या विचारातून प्रकटताना दिसते.

## प्रजापरिषदेचे सदस्य व संघटक

त्या काळात कोल्हापूर संस्थानात व पश्चिम महाराष्ट्रात भाई माधवराव बागल व रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या सर्व सभावर व समारंभावर निर्बंध लादण्यात आले होते. तरी देखील आण्णा कोल्हापूर संस्थानाच्या हद्दीबाहेर जनतेची संघटना करुन बागल यांच्या सभा पार पाडीत असत.

१९३८ मध्ये आण्णांनी शेतकऱ्यांची संघटना करुन कोल्हापूरच्या इ.स. १९४२ च्या ऑगस्ट दिवशी ब्रिटिश सरकारने महात्मा गांधीसहीत काँग्रेसच्या सर्व नेत्यांना तुरुंगात डांबून चले जाव चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. लाखो तरुण तरुणींनी जीवनाची आशा सोडून स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेतली. याच दरम्यान "३३ वर्षे वयाच्या आण्णांच्यावर सर्व कोल्हापूर प्रांतातील स्वातंत्र्य चळवळ पुढे रेटण्याची जबाबदारी येऊन पडली." २३ "सांगली, मिरज, कोल्हापूर त्याचप्रमाणे सोलापूर याच भागातील अनेक स्वातंत्र्य योध्दे रत्नाप्पाण्णांच्या मार्गदर्शनाखाली भूमिगत होऊन त्यांची

चळवळ जीवंत ठेवली." [२४] रत्नाप्पाण्णा हे ब्रिटिशांच्या हाती न सापडता वेशांतर करुन सर्व देशभर भ्रमण करुन हस्तपत्रके तयार करीत होते. या कामात "आण्णांच्या निकटवर्तीयांमध्ये भाऊसाहेब बिरोजे, कॉ. एस्.पी. पाटील, श्री. गोपाळ चिकोडे, श्री. भरमा चौगुले, श्रीपाल चौगुले, यशवंत कुलकर्णी व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील चिरस्मरणीय आहेत." [२५]

अनेकवेळा सांगली, मिरज येथे हस्तपत्रके छापून वाटण्याचे काम करीत असताना आण्णांनी पोलीसांच्या हातावर तुरी देऊन त्यांच्या हातून निसटून गेले. "जनावरांच्या गोठयात आश्रय देऊन एका म्हातारीने आण्णांना पोलीस पकडीपासून वाचविले आहे." [२६] "पकडलेल्या अनुयायांना पोलिसांनी मारहाण केली तरी आपल्या नेत्याचा पत्ता न सांगणे असे अनेकवेळा घडले आहे."

## भूमिगत चळवळ

रत्नाप्पांच्या अनुयायांनी गारगोटी, अर्जुनवाडा तसेच धरणगुत्ती येथील कचे-यांना आग लावली. "कुरुंदवाडपासून ते जयसिंगपूर पर्यंतचे टेलिफोनचे मार्ग तोडून टाकले, इतकेच नव्हे तर हातकणंगले व जयसिंगपूर रेल्वे स्टेशन लुटले." [२७] सासवड आश्रमातील कदम गुरुजींच्या माहितीच्या आधारे "जेजूरीच्या खंडोबाचे देऊळ लुटण्याची मा. आण्णांच्या मार्गदर्शनाखाली योजना तयार केली व ती अतिशय हिकमतीने यशस्वीरित्या पार पाडली." [२८] यात कॉ. एस्.पी. पाटील, डॉ. कुलकर्णी इत्यादींना साडेसहा वर्षाची सक्त मजूरी झाली. बार्शी लाईट रेल्वे लुटण्याचा कार्यक्रम आखला गेला. बार्शी रेल्वे लुटली, पोस्टाचा डबा लुटला, "लुटीत फक्त २,०००/- रुपये मिळाले." [२९]

"कोल्हापूरात निर्वासित ब्रम्हदेश सरकारच्या २,७००/- रुपये खजिन्याची भरदिवसा लुट केली."[30] पुढे साखरप्यावरील हल्ल्यात गोवेकर फौजदार व पोलीस फौज नंगे करुन खांबाला बांधून त्यांचा युनिफॉर्म, ड्रेस व रायफली घेऊन जवळचा दारुगुत्ता जाळून, विशाळगड मार्गे रात्री २ वाजता निघून गेले." [31] "विश्रामबाग स्टेशन भस्मसात केले." [32] "हुपरीची चावडी व दारुगुत्ता व पोस्ट भस्मसात केले." [33] "पन्हाळ गडावरील आरामगृहे जाळली." [34] तसेच "कोल्हापूरनजीक उजळाईवाडी लगत या विमानतळावर हल्लाही केला. तेथील यंत्रसामग्री फोडली व इमारत जाळली, तो आगीचा प्रचंड लोळ कित्येक मैलावर दिसत होता." [35] "गव्हर्नर विल्सनचा पुतळा फोडला." [36] ब्रिटिशांच्या मालकीचे धन व सोने लुटून त्याचा साठा करुन देशाच्या प्रगतीसाठी त्यांनी त्याचा उपयोग केला. कणाकणाने साठा केलेले धन व सोने याचा आण्णा नेहमी हिशोब लिहून ठेवत असत.

## वडील - भरमाप्पांचे निधन

"१९४३ मध्ये आण्णांचे वडील भरमाप्पा हे शिवाधीन झाले."[37] वडिलांच्या अंत्यदर्शनास आण्णा नक्की येणार म्हणून पोलीस त्यांच्या मागावर होते. पण यावेळीही आण्णांनी वेषांतर करुन आपल्या वडीलांचे अंत्यदर्शन घेऊन केव्हा निसटून गेले याचा पोलिसांनादेखील पत्ता लागला नाही. याविषयी दैनिक सागरमध्ये दे.भ. रत्नाप्पा कुंभार गौरव पुरवणी अंक ७५ व्या वाढदिवशी काढून "वेषांतर करुन वडिलांचे अंत्यदर्शन" या शिर्षकाखाली छापले होते. ते, "भूमिगत चळवळीची धुरा खांद्यावर घेऊन देशभक्त रत्नाप्पाण्णा अहोरात्र काम करीत होते. त्यांना पकडण्यासाठी पोलीस जंगजंग पछाडत होते. मा. रत्नाप्पाण्णा यांना याच ऐन आणिबाणीच्या काळात मोठा मानसिक धक्का बसला. त्यांचे स्फूर्तिस्थान व प्रेरणास्थान असलेले प्रेमळ पिताजी निवर्तले. आता वडिलांचे अंत्यदर्शन

घेण्यासाठी रत्नाप्पाण्णा येतील या आशेने पोलिसांनी वडिलांचा पार्थिव देह आपल्या कडेकोट पहाऱ्यात ठेवला व अंत्यदर्शनासाठी आल्यावर रत्नाप्पाण्णांना पकडू असे मांडे मनात खात बसले. पण याही परिस्थितीत रत्नाप्पाण्णांनी पोलिसांना चकविले. वेषांतर करून ते आपल्या वडिलांचे अंत्यदर्शन घेऊन केव्हा निसटून गेले याचा पोलिसांना पत्तादेखील लागला नाही. मा. रत्नाप्पाण्णा भूमिगत स्थितीत जेव्हा क्रांतीकारी चळवळ चालवीत होते तेव्हा पोलिसांनी त्यांची इतकी दहशत घेतली होती की, त्यांचा पत्ता सापडावा म्हणून वेडयापिशा झालेल्या पोलिसांनी अनेक निरपराध माणसांना बेदम अमानुष मारहाण केली होती." [38]

प्रजापरिषदेचे अधिवेशन आटोपून येत असता डिसेंबर, १९३९ ला आण्णांना राजद्रोहाच्या आरोपावरून २ वर्षांची व ५००/- रुपये दंडाची शिक्षा झाली. त्यांच्या बरोबर इतर १०० कार्यकर्त्यांना शिक्षा झाली. पुढे "२६/११/१९४० ला राजाराम छत्रपतींचे निधन झाले व त्यानंतर सर्व राजबंद्यांची सुटका केली. त्यात रत्नाप्पाण्णा सुटले." [३९]

"३ एप्रिल, १९४६ रोजी मुंबई प्रांतात कॉंग्रेसचे मंत्रीमंडळ अधिकाररूढ झाले. त्याने तावडतोब कॉंग्रेस कार्यकर्त्यांवरील वॉरंटे काढून टाकली. त्यामध्ये कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे सरचिटणीस श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्यावरील मुंबई प्रांतातील वॉरंट परत घेण्यात आले होते. रत्नाप्पाण्णा १९४२ पासून भूमिगत राहून कार्य करीत होते. त्यांना पकडण्यासाठी मोठे बक्षिसही कोल्हापूर दरबारने जाहीर केले होते. परंतु अखेरपर्यंत ते सापडले नाहीत. शेवटी मुंबई सरकारच्या आदेशास अनुसरून कोल्हापूर दरबारने राजबंद्यांची सुटका करण्याचे ठरविले व कित्येक वॉरंटेही रद्द केली दि. २५ मे, १९४६." [४०]

"रत्नाप्पाण्णा प्रजापरिषदेच्या मंत्रिमंडळात सामील झाले नाहीत." [४१] त्यामुळे जनतेमध्ये न कळत गैरसमज पसरला. "बागल ह्यांच्याबरोबर माझे मतभेद आहेत, त्यामुळेच मी मंत्रीपदापासून दूर राहिलो." [४२] हे कारण जरी आण्णांनी सांगितले तरी का देव जाणे बागल व आण्णा ह्यांच्यामधील वैमनस्य जनतेस उठून दिसले. १५ ऑगस्ट, १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. सर्व स्वातंत्र्य सैनिकांवरील खटले मागे घेण्यात आले.

## आण्णा प्रकट झाले - आण्णांचा बिंदू चौकात सत्कार

प्रथमच सर्व जनतेस आण्णा मुक्तपणे दिसणार ही बातमी कोल्हापूर राज्यात वाऱ्यासारखी पसरली. "धैर्यवान क्रांतीवीराला सामोरे जाण्यासाठी कोल्हापूरच्या बिंदू चौकात ९ ऑगस्ट रोजी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आलेला होता." [४३] आण्णांना "एक लक्ष रुपयांची देणगी देण्याची योजना तयार झाली होती." [४४] जनतेकडून सत्कार झाल्यानंतर थैली अर्पण करण्यास कार्यकर्ते सामोरे आल्यावर आण्णांनी भावनावश होऊन काढलेले उद्गार सर्वांना चकित करणारे होते. "प्रिय मित्रांनो व देश बंधूनो, भारत मातेची पारतंत्र्याच्या बेडीतून मुक्तता करण्यासाठी अखंड जीवनाचे बलिदान करण्यामध्ये मी उभा होतो. माझ्या नेतृत्वाचा स्वीकार करून लक्षावधी लोकांनी स्वातंत्र्याची चळवळ चालवली. त्या सर्वांचा मी कायमचा ऋणी आहे. १९३४ पासून ४२ पर्यंत मी एक देशभक्त होतो व माझ्या वाट्याला आलेले कर्तव्य मी पार पाडले आहे. मला स्वत: मी देशभक्त होतो व मी देशभक्त म्हणवून घेणे मला अभिमानाचे वाटते.

स्वातंत्र्य संग्रामामध्ये ब्रिटिश राजकर्त्यांच्या क्रूर कृत्यामुळे हौतात्म्या पत्करलेल्या माझ्या शूर सहकारी मित्राबद्दल व वयाने लहान थोर अनुयायाबद्दल कितीही कृतज्ञता व्यक्त केली तरी ती कमीच. कारण की लढ्याचे धैर्य

त्यांच्यामध्ये तीव्र, अनावर असल्यामुळे मला नेता हे बिरुद (पदवी) मिळाली. कारण आज तुम्ही माझा सत्कार करता ते योग्यच असेले तरी सत्काराचे श्रेय मला एकट्यालाच मिळणे योग्य नाही. ते श्रेय प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे माझ्या विचारांना प्रतिसाद देणाऱ्या त्या देशबांधवांकडेही जाते." [४५]

सत्कार स्वीकारणे योग्य आहे. मात्र थैली स्वीकारणे योग्य आहे की नाही याचा विचार केला पाहिजे. स्वातंत्र्य लढयात माझे अनुयायी आपले बांधव, भगिणी, मुले यांना मुकले आहेत. बहुमोल जीवन ते गमावले आहेत. "माझे वैयक्तिक मत तुम्ही ऐकणार असाल तर स्वातंत्र्य लढयामध्ये होरपळून निघालेल्या माझ्या देशभक्त स्वातंत्र्य सैनिक बंधूंच्या कल्याणासाठी या एक लाख रुपयांचा विनियोग व्हावा." [४६] असे नम्रपणे समजावून सांगून हाती आलेली मोठी रक्कम त्यांनी नाकारली.

## संस्थानिकांचे विलिनीकरण - दक्षिणेकडील पोलादी पुरुष रत्नाप्पाण्णा कुंभार

भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र संस्थानिकांचा प्रश्न सुटला नव्हता. १९४७ मध्ये भारतात ७०० संस्थानी राज्ये होती. भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेलांनी संस्थानिकांचे विलीनीकरण करण्याचा दृढ संकल्प केला. "पोलादी पुरुष रत्नाप्पाण्णा" असे त्यांना म्हटले जाते. त्यासाठी त्यांनी "एका परिषदेची स्थापना केली व त्यासाठी कोल्हापूर जिल्हयाचा प्रतिनिधी म्हणून रत्नाप्पाण्णांची निवड केली." [४८] बागल यांच्या अनुयायांचा समूह विलिनीकरणास विरोध दाखवित होता. तर रत्नाप्पाण्णांच्या अनुयायांचा समूह संस्थानांच्या

विलिनीकरणास उत्सुकता दाखवित होता. "रत्नाप्पाण्णांनी सरदार पटेलांचा उजवा हात म्हणून काम केले." [४९] दक्षिण महाराष्ट्रातील अनेक संस्थानिकांची मनं वळवून त्यांची संस्थाने संघराज्यात विलिन करण्याचा आण्णांनी प्रयत्न केला. याकेळी देशी संस्थानिकां-कडून आण्णांना धमक्या येत असत. "कित्येक ठिकाणी आण्णांना प्राणघातक (हत्या) प्रसंगाना सामोरे जावे लागले."[५०] बेळगांव,कोल्हापूर, सांगली जिल्हयातील कित्येक संस्थानिकांना अखेर आण्णांच्या अगाध सामर्थ्यासमोर शरण यावेच लागले, तर काही संस्थानिक पटेलांच्या दबावामुळे शरण आले. "रत्नाप्पाण्णांच्या खात्यास १६ संस्थाने विलीन करुन घ्यावयाचे श्रेय आले." [५१] हे सर्व त्यांच्या कामाच्या चिकाटीतूनच साध्य होऊ शकले. "आण्णांच्या या लढयाच्या सामर्थ्याची प्रशंसा सरदार पटेलांनी १९४९ च्या जयपूर कॉंग्रेस अधिवेशनात केली."[५२] पंडित जवाहरलाल नेहरु यांनी "पार्लमेंटचे सभासद म्हणून आण्णांची निवड केली." [५३] रत्नाप्पाण्णा संसदेचे सभासद झाल्यानंतर त्यांची घटना समितीचे सभासद म्हणून नेमणूक झाली. "डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या घटनेच्या पुस्तकावर नेहरु, डॉ. राजेंद्र प्रसाद त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर यांच्या सारख्या अतिरथी, महारथी व्यक्तीबरोबर सही केली होती. हयामध्ये आण्णांची कार्यकौशल्यता दिसून येते."[५४]

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या हाकेला ओ देऊन अनेक कॉंग्रेस नेत्यांनी अधिकाऱ्याच्या पदाचा त्याग करुन जनसेवेत रुजू झाले होते. रत्नाप्पाण्णा हे त्यातीलच एक होत. आण्णांची अप्रतिम कार्यशैली व अगाध सामर्थ्य पाहून पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मंत्रीमंडळाने त्यांना कोल्हापूर जिल्हयाचे श्रेष्ठ कॉंग्रेस नेते म्हणून मान्यता दिली. आण्णांनी कोल्हापूर जिल्हयाचा कॉंग्रेस पक्ष म्हणजे देशभक्तांच्या समूहांचे भरघोस

पिक करून सोडले. कोल्हापूर संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले असताना संस्थानच्यावतीने चालविले जात असलेले शहाजी लॉ कॉलेज अनाथ झाले. उत्तम संचालक मंडळी व योग्यवेळी आर्थिक मदत न मिळाल्याने हे जिल्ह्यातील एकमेव लॉ कॉलेज दिवसेंदिवस अधोगतीस चालले होते. बरोबर अशावेळी संकटाला रत्नाप्पाण्णा धावून आले.

## दि कौन्सिल ऑफ एज्युकेशनची स्थापना -

"कौन्सिल ऑफ एज्युकेशन" ही कोल्हापूर व सभोवतालच्या परिसरात शैक्षणिक कार्य करणारी महाराष्ट्रातील एक नामवंत संस्था आहे. या संस्थेच्या विद्यमाने - १) शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, २) कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, ३) नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर ही महाविद्यालये चालविली जातात. शिक्षण प्रसार व गुणवत्ता या दोन्ही दृष्टीने ही महाविद्यालये प्रसिध्द आहेत. या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार हे आहेत. या विषयी प्राचार्य ग.भा. कुरणे म्हणतात, "कौन्सिल ऑफ एज्युकेशन" या संस्थेला व या संस्थेने चालविलेल्या महाविद्यालयांना आज जी मोलाची प्रतिष्ठा लाभली आहे तिचे बहुतांशी श्रेय मा.श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या अंगभूत कार्यकुशलत्वाला द्यावे लागेल. अनेक नामवंत व्यक्ती, संस्था, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते व विश्वासू सहकारी यांचे हार्दिक सहकार्य मा. आण्णा यांनी यशस्वीरित्या सातत्याने मिळवून दिले आहे." ५५

### (१) शहाजी लॉ कॉलेज -

"दि कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशन" या संस्थेच्या घटनेत बदल

करुन "दि कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशान", कोल्हापूर ही नवी संस्था १९५१ मध्ये स्थापन केली. संस्थेचे अध्यक्ष म्हणून लॉ कॉलिजचे माजी विद्यार्थी व त्यावेळचे हिंदी पार्लमेंटचे सभासद श्री. दे.भ. रत्नाप्पा कुंभार व संस्थेचे सेक्रेटरी म्हणून कै. ॲड. श्री. एस्.जी. दाभोळकर यांची निवड केली. संस्था दिनांक २६ फेब्रुवारी, १९५१ रोजी रजिस्टर करण्यात आली. त्यावेळी "साईक्स लॉ कॉलिज" हे नाव बदलून "शाहाजी लॉ कॉलिज असे नामकरण करण्यात आले." [५६]

"संस्थेने १० जून, १९५१ रोजी हे कॉलिज सरकारकडून आपल्याकडे चालविण्यास घेतले. तेव्हापासून आजपर्यंत हे कॉलिज सरकारी अनुदाना-शिवाय फक्त संस्थेच्या मिळकतीतून अत्यंत काटकसरीने व काही विद्यावेतन व जुजबी मानधन घेऊन काम करणाऱ्या स्वार्थ, त्यागी व विद्वान प्राध्यापकांच्या वकिलांच्या सहाय्याने यशस्वीपणे चालविण्यात येत आहे." [५७]

(२) कॉलिज ऑफ कॉमर्स -

"कोल्हापूर शहरातील व आसपासच्या परिसरातील व्यापार व औद्योगिक वाढ लक्षात घेऊन वाणिज्य शास्त्रांच्या पदवीधरांची गरज लक्षात घेऊन व्यापार विषयक शिक्षण देणारे महाविद्यालय काढावे या विचाराने "दि कौन्सिल ऑफ लिगल एज्युकेशानने", १९५७ साली काळाची गरज म्हणून "कॉलिज ऑफ कॉमर्स" हे महाविद्यालय सुरु केले. १९६७ पासून ही संस्था "कौन्सिल ऑफ एज्युकेशान" या नावाने सुपरिचित आहे." [५८]

"या कॉलिजचे पहिले प्राचार्य कै.भा.श. भणगे यांची नेमणूक झाली." [५९] १८ लाखाची ५ मजली इमारत कॉलिज ऑफ कॉमर्ससाठी बांधली. १३९

विद्यार्थी संख्या असलेल्या महाविद्यालयात आज २,५०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(३) नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँण्ड कॉमर्स -

"आर्थिक अडचणीमुळे, नोकरी व्यवसायामुळे तसेच आर्थिक परिस्थिती हलाखीचे असल्यामुळे ज्यांना उच्च शिक्षण घेता आले नाही व ज्यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागले, अशा समाजातील विद्यार्थ्यांची गरज ओळखून "कौन्सिल ऑफ एज्युकेशनने" १९७१ साली नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँण्ड कॉमर्स हे रात्रीचे महाविद्यालय सुरु केले."[६०] "ज्या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य एम्.डी. देशपांडे हे होते."[६१]

शिक्षण हे समाज व राष्ट्र परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. हे "कॉलेज ऑफ एज्युकेशनने" सिध्द करुन दाखविले.

(४) कै.दादासो रामचंद्र मगदूम मास्तर स्मारक समिती का। सांगाव -

कै. दादासो रामचंद्र मगदूम मास्तर स्मारक समिती का। सांगाव ता. कागल, जि. कोल्हापूरची स्थापना सन १९५० चा मुंबई अधिनियम क्र.२९ अन्वये कोल्हापूर विश्वस्त व्यवस्था नोंदणी क्रमांक ई २६३/दि. ११.६.१९६० बॉम्बे सोसायटी अँक्ट, १८६० अन्वये नोंदणी नं. १५९/दि. ११.८.१९६१ ने स्थापना केली." [६२] "या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून दे.भ. श्री. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे नेतृत्व लाभले आहे." [६३] या संस्थेची डी.एम्. हायस्कूल, का। सांगाव १) ज्यूनियर कॉलेज, २) माध्यमिक, ३) तांत्रिक तसेच रत्नदिप हायस्कूल, गंगानगर, इचलकरंजी येथे - १) ज्युनियर कॉलेज, २) माध्यमिक, ३) तांत्रिक तसेच कुमार विद्यामंदीर प्राथमिक, गंगानगर,

इचलकरंजी इत्यादि शाखेमार्फत ज्ञानदानाचे पवित्र काम केले जात आहे. विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना करून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या दिनदुबळ्या दलित, पददलित समाजाला शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षणासाठी कोल्हापूर हे एक महत्वाचे केंद्र बनले आहे. त्यात रत्नाप्पाण्णांचा वाटा सिंहाचा आहे.

## सहकार

१) दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी -

सहकारी चळवळीतील आण्णांचे योगदान फार श्रेष्ठ दर्जाचे आहे. श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर, इचलकरंजी हा आण्णांच्या अथक प्रयत्नातून उभा राहिला. "१ ऑक्टोबर, १९५५ रोजी या कारखान्याची स्थापना झाली." [६४] यावेळी "केंद्र सरकारकडून १००० टन ऊस गाळण्याचा परवाना मिळालेला होता."[६५] "आज हा कारखाना दररोज ५,००० मे.टन ऊसाची गाळप करतो आहे."[६६] "या कारखान्याचे रत्नाप्पाण्णा कुंभार हे संस्थापक चेअरमन आहेत." [६७] "कारखान्याने पहिली उत्पादित केलेली साखर भेट म्हणून भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना संस्थापक चेअरमन दे.भ. पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णां कुंभार यांनी दिली." [६८]

कारखान्याच्या माध्यमातून आण्णांनी विविध क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरी केलेली दिसते.

## कारखान्याचा शेती विभाग - शेती विषयक योजना :

१) ऊस उत्पादन
२) माती परीक्षण
३) शुध्द व निरोगी ऊस बेणे पुरवठा
४) मळी खत
५) अनुदानावर रासायनिक खत वाटप योजना
६) ऊस जातीचे प्रयोग
७) ऊस पीक संरक्षण व पीक संवर्धन योजना
८) बोअरिंग/ब्लास्टींग योजना
९) शेती अवजारे व यंत्रसामुग्री
१०) ऊस पीक स्पर्धा
११) गोबर गॅस व फायबर ग्लास कोटींग योजना
१२) पशु चिकित्सालय
१३) हरिजन को-पार्टनर शेती
१४) फळझाडे व वनझाडे रोपे पुरविणे
१५) ऊस वाहतूक योजना
१६) ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदारांना दिलेली बक्षिसे
१७) सवलतीचे दरात साखर वाटप
१८) पाणंद रस्ते व खडीचे रस्ते
१९) डिस्टीलरी विभाग
२०) जल उपसा सिंचन विभाग
२१) सिव्हील विभाग
२२) कारखान्यातील कामगार व त्यांच्या सुखसोयी
२३) जनसंपर्क विभाग

२) जनता बझार -

जनतेला लागणा-या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वाजवी दरात व्हावा, हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन, "रत्नाप्पाण्णांनी जनता बझारची स्थापना दिनांक २४ जानेवारी, १९६३ रोजी केली."[७०] आज जवळ जवळ ४१ शाखा कोल्हापूर जनता सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर यांच्या आहेत." [७१] "यात १४ डिपार्टमेंट स्टोअर्स असून २ फिरते जनता बझार आहेत. याद्वारे सर्व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. संस्थेच्या एकूण १६ रास्तभाव दुकाने असून रेशनमाल पुरवठा केला जातो. या बरोबरच अनियंत्रित अन्नधान्य विकले जाते. होलसेल साखर विक्री नॉमिनी म्हणून ही संस्था काम करीत आहे. बेकारी, होजिअरी, कागद विभाग, वाहतूक विभाग, स्पिरीट विभाग, डिझेल विभाग ही विभागे कार्यरत आहेत." [७२] "या संस्थेचे सभासद संख्या १७,८७५ व्यक्ती व संस्था ११० आहेत. शेअर भांडवल ५८,५६,९३१/- रुपये इतक्या आहेत. तर निव्वळ नफा ८०,२८४/- रुपये इतका होता." [७३] तर "१९९४-९५ या सालात सभासद १७,९६३ व्यक्ती व संस्था ११० आहेत. शेअर भांडवल ५८,७४,६६८/- रुपये इतके असून निव्वळ नफा ८४,४२३/- रुपये इतका आहे." [७४]

३) कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सुतगिरणी लि.इचलकरंजी -

विणकरांचा धंदा हा कोल्हापूर जिल्ह्याचा पूर्वापार चालत आलेला एक वैभवशाली धंदा आहे. आज कोल्हापूर जिल्ह्यामध्ये जवळ जवळ ५० हजार यंत्रमाग व १० हजार हातमाग आहेत. या धंद्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे सूत याची आयात देशातील इतर ठिकाणाहून करावी लागत असे.

बाहेरून पुरवठा केल्या जाणाऱ्या सूताच्या किंमतीमध्ये होणारे फेरबदल, त्याचप्रमाणे आवश्यक त्याप्रमाणे सूत पुरवठा होण्याची शाश्वती नसल्याने या धंद्यावर संकटाची टांगती तलवार कायमच होती.

कोल्हापूर जिल्हा आणि विशेषत: हातकणंगले व शिरोळ हे दोन तालुके आणि कागल व गडहिंग्लज तालुक्यातील काही भाग हे पूर्वापार कापूस पिकविणारे आहेत. हा भाग लांब धाग्याच्या कापसाच्या लागवडीला सुयोग्य आहे. नजीकच्या भविष्य काळात या भागामध्ये २५ हजार जमीन या लांब धाग्याच्या कापसाच्या लागवडीखाली येण्यासारखा आहे.

समाजाचे हे दोन घटक विणकरी व शेतकरी आजपर्यंत कधीही एकत्र आलेले नव्हते. किंबहुना या दोघांचे हितसंबंध एकमेकांवर अवलंबून ठेवल्यास आपले नुकसान ही विवंचना या दोन्ही घटकांना भेडसावित होती. अशा दोन्ही घटकांना म्हणजे कापूस पिकविणारा शेतकरी आणि विणकरी या दोघांना प्रथम एकत्र आणून कार्यप्रवृत्ती करण्याचे काम गिरणीने केले. कोल्हापूर जिल्हयाचे नेते मा.दे.भ. डॉ. रत्नाप्पा कुंभार यांचे समर्थ आणि मान्यवर कुशल मार्गदर्शनाखाली केले आहे.

"१७ ऑगस्ट, १९६४ रोजी महाराष्ट्र कायद्याखाली क्रमांक (I) १ ने नोंदविण्यात आली." ७५ "इचलकरंजी शहराच्या सिमेलगत जयसिंगपूरच्या रस्त्यावरील "यड्राव" गावच्या हद्दीत १११ एकर १२½ गुंठे जमीन खरेदी केली." ७६ "पाण्यासाठी जॅकवेल पंचगंगा नदीवर बांधून घेतले. हयांचे "पहिले संचालक मंडळाचे चेअरमन दे.भ. रत्नाप्पा कुंभार हेच होते." ७७ याच्या माध्यमातून कापूस उत्पादनाला चालना देण्याचे काम केले जात आहे.

यासाठी शेतक-याना चांगल्या दर्जाची बी-बियाणे व कुशल तंत्रज्ञान पुरविले जाते. सुतगिरणीच्या माध्यमातून बेकारी सारखा राष्ट्रीय प्रश्न आण्णांनी सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे." "१९६७-६८ मध्ये २,३६३ सभासद संख्या असणा-या या संस्थेची १९८७-८८ साली १६,४९३ पर्यंत सभासद संख्या इतकी पोहचली. तर भागभांडवल १९६७-६८ ला ८.२३ होती. ती १९८७-८८ ला २४.३० पर्यंत पोहचली आहे." [७८] मोठया प्रमाणात सुताची उलाढाल, उत्पादन व सुतविक्री निर्यात योग्य सुत उत्पादक, कापूस योजनेखाली प्रायोगिक प्लॅंट, सुधारित कापसाच्या बियाणांचा पुरवठा, कापूस पिक संरक्षण योजना, औषध पुरवठा, या माध्यमातून ही संस्था समाजसेवा करीत आहे.

अलीकडे सत्ता संघर्षातून त्यांचे सहकारी यांच्यात मतभेद झाल्याचे दिसतात. सहकाराच्या माध्यमातून रत्नाप्पाण्णांनी जनसेवेची कामगिरी करीत आहेत.

४) दि पिपल्स को-ऑप. बँक लि., इचलकरंजी, जि. कोल्हापूर

इचलकरंजी नगरीतील वस्त्रोद्योग व उद्योगाच्या अनुषंगाने गरीब लोकांच्या उद्योगात अर्थसहाय्य करण्यासाठी व वाढीस लावण्यासाठी व उद्योगावर विसंबून असणा-या लोकांचे राहणीमान उंचविण्यासाठी मा.दे.भ. रत्नाप्पा कुंभार यांच्या प्रेरणेने व नेतृत्वाने या बँकेची स्थापना तारीख २१.१२.१९६२ रोजी झाली."[७९] "१९८५ ला सभासद संख्या १०,८१४ होती. १७ लाख वसूल भागभांडवल, गंगाजळी व इतर निधी ४४ लाख २६ हजार, निव्वळ नफा ६.४१ लाख तर लाभांश दर १२ टक्के."[८०]

आण्णा व राजकारण

मा. रत्नाप्पाण्णा राजकीय मुत्सद्दी असे म्हटले जाते. "महात्मा गांधी, सरदार पटेल, पट्टाभिसितारामय्या, डॉ. आंबेडकर, नेहरु, शास्त्री, यशवंतराव चव्हाण, डॉ. राजेंद्र प्रसाद, मुरारजी देसाई, डॉ. एस्. राधाकृष्णन त्याचप्रमाणे वसंत दादा पाटील ह्यांच्या सारख्या राजकीय धुरीणांचे आण्णा मित्र म्हणून राजकारणाकडे एक सेवाक्षेत्र म्हणून पहातात. जनसेवा करण्याचे एक साधन म्हणूनच त्यांनी आजपर्यंत राजकारणाकडे पाहिले."[८२] "इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी.व्ही. नरसिंहराव, शंकरराव चव्हाण यांच्यासारखे राजकारणी मंडळींचा मित्र म्हणून असणाऱ्या आण्णांच्यामध्ये राजकारण हे एक नवयुगाचा आरंभ करणारे अस्त्र आहे ही जाण निर्माण केली आहे."[८३] प्रजापरिषद, राष्ट्रीय कॉंग्रेस, कॉंग्रेसचा कार्यकर्ता, महाराष्ट्र राज्य कॉंग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष, राज्य विधानसभेचे जेष्ठ सभासद, मंत्रिमंडळातील विविध खात्याचे मंत्री, खासदार, सभापती अशा विविध भूमिका आण्णांनी आजपर्यंत वठविलेल्या आहेत."[८४] १९७४-७५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात"पाणी अडवा व जिरवा" असे सांगून धरणे बांधली. "१९७४-७५ मध्ये राज्याच्या गृहखात्याचे राज्यमंत्री"[८५] म्हणून १९७७-७८ मध्ये नगरविकास मंत्री म्हणून तर १९८३ ला प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष[८६] म्हणून पदे भूषविली.

दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार आपल्या राजकीय व्यक्तिमत्त्वाबद्दल बोलताना म्हणाले, "मी विधायक वृत्तीचा राजकारणी कार्यकर्ता आहे, विध्वंसक राजकारणात मी कधीही गुंतवून पडलो नाही. विधायक राजकारणाद्वारेच आपण आपले ध्येय व उद्दिष्ट गाठू शकतो. समाजाच्या जनतेच्या कल्याणासाठी विधायक राजकारण तुम्ही केले पाहिजे. सहकारातील राष्ट्रीय चारित्र्याबद्दल ते म्हणतात, "नही संस्कार। नही सहकार ।"[८७]

आण्णांना अनेक पदव्या बहाल / मानचिन्हे मिळाली -

आण्णांनी संपूर्ण हयातीत देश सेवेला अग्रक्रम दिला. सामान्यांच्या प्रगतीत धन्यता मानली. उपजत कुशाग्र बुध्दीचे, गुणातच तल्लख बुध्दीचे, उपजत लढवय्ये, स्वातंत्र्यसेनानी, घटनासमितीचे सभासद म्हणून, शिक्षण संस्थेचे आश्रयदाते म्हणून श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक म्हणून, ग्राहक भांडारचे संस्थापक म्हणून, ग्रामविकासाचा मूळपुरुष, तरुण वर्गाचा आदरणीय नायक म्हणून, विश्रांती माहित नसलेला कर्मयोगी म्हणून, राजकीय मुत्सद्दी म्हणून, बँकांचे संस्थापक म्हणून कार्य केलेल्या रत्नाप्पाण्णांच्याकडे पाहिल्यावर अजूनही चालतोची वाट.

"रत्नाप्पाण्णांना भारत सरकारने २६ जानेवारी, १९८५ मध्ये "पद्मश्री" हा किताब देऊन गौरव केला आहे." [८८] "१९८९ मध्ये ७७ वर्षे पूर्ण झालेबद्दल कोल्हापूर महानगरपालिकेने नागरी सत्कार आयोजित केला होता.[८९] "१९८७ मध्ये पुणे विद्यापीठाने "डी. लिट" ही पदवी दिली." [९०] व त्यांच्या कामाचा यथोच्च गौरव केला, असे हे आण्णांचे जीवन वैभवशाली आहे. "आज वयाच्या ८७ वा वाढदिवस नुकताच १५ सप्टेंबर, १९९५ रोजी संपन्न झाला."[९१] आजही ८७ व्या वर्षात तरुणांना लाजवेल असा उत्साह त्यांच्या अंगी आहे. सदैव कार्यकर्त्यांचे मोहोळ त्यांच्या भोवती असते. आण्णांचा जनसंपर्क प्रचंड आहे. शिरोळ मतदार संघात आणि श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगरच्या परिसरात घरोघरी आण्णांची पुजा केली जाते. आण्णांचे नेतृत्व उदयोन्मुख तरुणांना मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा समाजात खोलवर रुजलेला आहे. पद्मश्री रत्नाप्पाण्णा यांनी सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात आजवर केलेले कार्य मोलाचे असून, समाजजीवनावर त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा निश्चितच उमटला आहे. "लोकनेते पद्मश्री डॉ. आमदार

रत्नाप्पा कुंभार यांचे वर्णन, थोर क्रांतीकारक - झुंजार राष्ट्रभक्त , सहकारमहर्षी, संस्कृतीनिष्ठ "आजातशत्रू" ८५ वर्षे अविरत कार्यरत असणारे , उमेदी, उत्साही व परोपकारी आवडते नेते डॉ. रत्नाप्पा कुंभार अशा ठळक अक्षरात केली आहे." [९२] कोल्हापूर जिल्ह्याच्या कायापालटास त्यांचा मोठा हातभार आहे.

मूल्यमापन

"सध:स्थितीत कॉंग्रेस पक्षास त्यांच्या मार्गदर्शनाची निश्चितच गरज आहे." [९३] असे उद्‌गार शरद पवार यांनी आण्णांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त पाठविलेल्या दिव्य संदेशात काढलेले आहेत. त्यांचे जीवनकार्य सर्वांना प्रेरणादायी ठरणारे आहे.

"भारतीय स्वातंत्र्य लढयातील रणझुंझार सैनिक, कृषी औद्योगिक समाजरचनेचे शिल्पकार, सहकार क्षेत्रातील तडफदार लोकनेते, पदापेक्षा सेवा श्रेष्ठ मानणारी वृत्ती." [९४] अशा शब्दात आण्णांचे वर्णन डी.लिट. पदवी देत असताना पुणे विद्यापीठाने गौरवपत्रात केले आहे. तर कोल्हापूर महानगरपालिकेच्या मानपत्रात दे.भ. रत्नाप्पाण्णा, क्रांतीकारक आण्णा, दक्षिणेचे वल्लभभाई, तळहातावर शिर घेऊन लढणारा नरवीर, पद्मश्री आण्णा, भाग्यविधाते आण्णा, समाजधुरीण आण्णा, कर्मयोगी आण्णा" [९५] अशा शब्दात आण्णांचे वर्णन केलेले आहे.

"आचार्य विनोबाजींनी,"सामाजिक कार्यात मग्न असलेला वेडा कुंभार" म्हणून आपला गौरव केला. खरे तर आपण आधुनिक भारताचे "गोरा कुंभार" आहात, आपण राष्ट्रवीर तसेच कर्मवीर ही" . [९६]

"लोकशाही समाजवादाचा पुरस्कर्ता, शेतकरी आणि शेतमजूरांचा कैवारी, संस्थानी विलिनीकरणाचा कर्णधार, ग्रामविकास व सहकारातील मेरूमणी अशा शब्दात आण्णांचे वर्णन कुमार गारगोटे यांनी केले आहे."[१७]

रत्नाप्पाण्णांनी केलेल्या कार्याचे वर्णन वेगवेगळया मान्यवरांनी केलेले आहेत. त्यातील प्रमुख म्हणजे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, जयप्रकाश नारायण, श्री. मधुकरराव चौधरी, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार, सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे, श्री.शिवयोगी सिध्दरामेश्वर, प्रा. एन्.एम्. कांबळे, ना. वसंत साठे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव दादा पाटील, ना. शिवराज पाटील, श्री. ना.ग. गोरे, उपराष्ट्रपती बी.डी. जत्ती इत्यादी आहेत. ते वर्णन पुढीलप्रमाणे, एक थोर देशभक्त रत्नाप्पा हे सामुहिक शक्ती आहे. ती एक प्रवृत्ती आहे. हजारो लोकांच्या अंत:करणात सद्भाव निर्माण होतो तो याचमुळे, इतरांच्या जीवनास स्पर्श केल्याशिवाय हे समज सेवेचे प्रेम मिळत नाही, महाराष्ट्रात एक थोर आदर्श दिपस्तंभाप्रमाणे उभा आहे, तो म्हणजे रत्नाप्पाण्णा कुंभार होत. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे स्वातंत्र्य लढयातील तसेच स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक, राजकीय व विशेषत: सहकार क्षेत्रात केलेली कामगिरी अतिशय मोलाची आहे. लोकप्रतिनिधी व मंत्री म्हणून मा. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचा महाराष्ट्रातील सर्व जनतेला चांगला परिचय आहे. शेती, उद्योग व सहकार या क्षेत्रातील त्यांचे कार्य चिरस्मरणीय असून आज या वयातही त्यांच्या कार्यातील उमेद कायम आहे, नवीन पिढीला अत्यंत मार्गदर्शन होईल. मा. रत्नाप्पाण्णा कुंभार हे भारतमातेचे सुपुत्र शोभतात. स्वातंत्र्य आंदोलनात ज्योतीप्रमाणे अग्रभागी राहून त्याग, धैर्य व नेतृत्व या अमौलिक गुणांनी भू-मातेची सेवा केली. स्वातंत्र्योत्तर काळात "विना सहकार नही उध्दार" हा उद्घोष उरी बाळगून सहकार चळवळ खंबीरपणे चालू ठेवली. कोल्हापूर जिल्हयातील प्रजापरिषदेच्या

कार्यात व संघटना बांधण्यात श्री. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचा फार मोठा वाटा आहे. ते एक कुशल वक्ते आहेत. तसेच त्यांच्या-जवळ संघटना चातुर्य आहे. त्यामुळेच त्यांचा उपयोग संघटनेला तर झाला आहेच परंतु त्यांचा मित्र परिवारही मोठा झाला आहे. स्वातंत्र्य संग्रामाच्यावेळी भूमिगत राहून व त्यांनी नेहमीच जिद्दीने, कळकळीने व निष्ठेने हाती घेतलेली कामे यशस्वीरित्या पार पाडलेली आहेत. महाराष्ट्रात सहकारी चळवळीची सुरुवात झाली तेव्हा श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना सुरु करुन या चळवळीतील आपला वाटा त्यांनी उचलला. हा कारखाना आजही त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल करीत आहे. रत्नाप्पाण्णांनी या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत तर भाग घेतलाच पण स्वातंत्र्योत्तर काळात या देशात चालू असलेल्या विकास कार्यातही त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. त्यांचे जीवन-कार्य आपणा सर्वांना देश विकास आणि स्वातंत्र्य रक्षणाची प्रेरणा देईल.

ना.ग. गोरे यांनी रत्नाप्पाण्णांनी केलेल्या कार्याचे वर्णन असे केले, "माझा त्यांच्याशी प्रथम परिचय झाला तो १९४९ साली. कोल्हापुरात प्रजापरिषद तर्फे सुरू असलेल्या संघर्षामध्ये भाई माधवराव बागलांना अटक झाल्यावर लढयाचे नेतृत्व मा. रत्नाप्पाण्णांनी मोठया धैर्याने आणि जिद्दीने सांभाळले. त्यानंतरच्या राजकारणात त्यांनी निष्ठापूर्वक आपल्या पक्षाची व जनतेची सेवा केली. परंतु मंत्रीपदाचा हव्यास त्यांनी कधी धरला नाही. त्यांनी घेतलेले जनसेवेचे व्रत त्यांनी नव्या संदर्भात यशस्वीपणे पार पाडले. विशेष म्हणजे त्यांच्या या व्रताचा लाभ कोल्हापूरातील हजारो शेतकरी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांना झाला. पंचगंगा सहकारी साखर कारखाना ही जशी आण्णांच्या व्यवहार

कौशल्याची खूण, तशीच त्यांनी शेकडो ठिकाणी चालविलेली ग्रंथालये आणि पाणी पुरवठयाच्या कोटयावधी रुपयांच्या योजना त्यांच्या विधायक कर्तृत्वाची साक्ष देत आहेत. सत्तेच्या खुर्चीवर न बसता सुध्दा जनसेवेचा ध्यास घेतलेली आण्णासारखी व्यक्ती एवढे मोठे कार्य उभारून दाखवू शकते, हे रत्नाप्पाण्णांनी आपल्या कार्याने सिध्द केले आहे.

श्री. रत्नाप्पाण्णांसारखे ध्येयवादी ताकदीचे पाचदहा नेते जरी महाराष्ट्रात निर्माण झाले तरी, महाराष्ट्रातला ग्रामीण भाग पंजाब-प्रमाणे समृध्द होऊ शकेल याविषयी मला शंका नाही. महाराष्ट्रातील व भारतातील सर्वसामान्य जनतेला अशा नेतृत्वाची आज गरज आहे. मग मंत्रीपदावर कोणी येवो वा जावो."

रत्नाप्पाण्णा यांचे नेतृत्व कोल्हापूर जिल्ह्यास लाभले. कोल्हापूर जिल्ह्याचा हरित क्रांतीच्या माध्यमाने मातीचे सोने केले. संपूर्ण जिल्हाभर सहकारी संस्थांचे जाळे विणले. कॉंग्रेसचा एक द्रष्टा कार्यकर्ता म्हणून आजही अनेक राजकीय नेते आण्णांशी संबंध ठेऊन असतात. आण्णांनी कार्यकर्त्यांची निर्माण केलेली फळी अभेद्य आहे, हे अनेकदा त्यांनी विरोधकांना दाखवून दिले आहे. आण्णांचे जीवन विविध अंगी, सर्वस्पर्शी असून तरुण-पिढीला नवनेतृत्वाला तो मार्गदर्शक ठरेल. पर्वताचा महामेरू, राजकारणातील भिष्माचार्य, समाजकारण, राजकारणातील मुत्सद्दी असेच त्यांचे वर्णन करावे लागेल. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांच्या जीवनाची सुरुवात होऊन मंत्रीपदापर्यंत, सभापती पदापर्यंत ते पोहचले. ही त्यांच्या कर्तृत्वाची उंचावलेली कमान वाखाणण्यासारखी आहे. आज शिरोळ तालुका व हातकणंगले तालुका ग्रामपंचायत व तालुका पंचायत यात देशभक्त रत्नाप्पाण्णा

कुंभार यांचे वर्चस्व असलेले दिसते. एकूण ग्रामपंचायतीत सरपंच पद आण्णांच्या बाजूचे बहुमत असून पंचायत समितीत देखील आण्णांचे बहुमत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील विविध संस्थेत आण्णांचे नेतृत्व स्वीकारून काम करणाऱ्या संस्था संख्येने जास्त आहेत. जिल्हा परिषद, कोल्हापूर, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक या व अशा अनेक संस्थेत आण्णांचे नेतृत्वाखाली काम सुरळीत-पणे चालू असून येथील पदाधिकारी आण्णांचे नेतृत्व मान्य करून कामकाज करीत आहेत. भावी पिढीस आण्णांचे राजकीय नेतृत्व मार्गदर्शक ठरेल.

सारांश -
------

शोध निबंधाच्या पहिल्या प्रकरणात, "मा.दे.भ. डॉ.रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे बालपण, शिक्षण आणि स्वातंत्र्यलढयामध्ये सहभाग" या विषयी सविस्तर चर्चा केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील निमशिरगांव या लहानशा खेडयात व्यवसायाने कुंभार असणाऱ्या श्री. भरमाप्पाच्या व सौ. गंगुबाई यांच्या पोटी रत्नाप्पाण्णांचा जन्म १५ सप्टेंबर, १९०९ रोजी झाला. रत्नाप्पाण्णांच्या जन्माच्या वेळी गावात रोगाची साथ होती म्हणून त्यांचे आई-वडिल गाव सोडून शेतात रहात होते. रत्नाप्पाण्णांचा जन्म शेताच्या पाल्याच्या खोपीत झाला आहे. वयाच्या सातव्या वर्षी आईचे मायेचे छत्र हरवले. भरमाप्पानी दुसरे लग्न न करता मुलाचा सांभाळ केला. जन्मत:च कुशाग्र बुध्दीमत्ता, शिक्षणाची विलक्षण आवड यामुळे १९२८ ला मॅट्रिक पास झाले तर कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या विरशैव बोर्डींगमध्ये राहून बी.ए.ची पदवी राजाराम कॉलेजमधून संपादन केली. एलएल.बी.चा अभ्यास सुरु असताना त्यांचे लग्न पार्वतीबाईशी झाले.

विद्यार्थी दशेपासून संघटन कौशल्य अंगी असल्याने ते विशेष बोर्डिंगचे अधीक्षक होते. पुढे भाई माधवराव बागल यांच्याकडे आकर्षित होऊन प्रजापरिषदेचे सरचिटणीस म्हणून भूमिका पार पाडली. प्रजापरिषदेच्या कुपवाड येथील पहिल्या अधिवेशनाच्या वेळी डॉ. पट्टाभि सितारामय्या यांच्या अध्यक्षीय इंग्रजी भाषणाचे मराठीत अनुवाद केला, तो जमलेल्या लोकांना फारच आवडला होता. शेतक-यांचे मोर्चे आयोजित केले. फैजपूर काँग्रेसला जाऊन आले, म. गांधीजींचे शिष्य बनले. साधी राहणी, उच्च विचारसरणीची शिकवण अंगिकारली, ती आजही टिकविलेली आहे.

आण्णांचे व्यक्तिमत्व करारी, नवीन कांहीतरी करून दाखविण्याची जिद्द, चिकाटी, मनमिळावू स्वभाव, संघटक वृत्ती, मुत्सद्दीपणा, राजकारणात रस घेणारे असे आण्णांचे व्यक्तिमत्व आहे. आण्णांची "पत्रमैत्री" अजोड आहे. आजही आण्णा एकवेळच जेवतात. कारखाना परिसर पहाताक्षणी साधेपणा चटकन जाणवेल

प्रजापरिषदेचे संघटक, भूमिगत चळवळीतील खंबीर नेतृत्व आण्णांनी केले. वेषांतर करून संपूर्ण देशभर भ्रमण करीत राहिले. ब्रिटिशांच्या हाती लागले नाहीत. जनावरांच्या गोठयात आश्रय देऊन एका म्हातारीने आण्णांना पोलीस पकडीतून वाचविले. अर्जुनवाड, धरणगुत्ती, कवे-या जाळल्या. कुरूंदवाडपासून जयसिंगपूर पर्यंतचे टेलिफोनचे मार्ग तोडून टाकले. जेजुरीच्या खंडोबाचे देऊळ लुटले. बार्शी लाईट रेल्वे लुटली. ब्रम्ही सरकारचा खजिना लुटला. साखरप्यात पोलीसांवर हल्ला केला. विश्रामबाग स्टेशन जाळले. दुपरी चावडी, दानुत्ता व पोस्ट जाळले. ही अशी अनेक उदाहरणे दिली आहेत. वेशांतर करून वडिलांचे अंत्यदर्शन घेतले. आण्णांना २ वर्षाची ५ ५००/- रु. दंडाची शिक्षा झाली. स्वातंत्र्यानंतर आण्णा

कोल्हापूरच्या बिंदु चौकात प्रथम प्रकट झाले. त्यावेळी सत्कार समारंभ ठेवला होता. १ लाख रुपयाची थैली आण्णांना देण्यात येणार होती ती त्यांनी नाकारली.

संस्थानिकांचे विलीनीकरण - दक्षिणेचा पोलादी पुरुष म्हणून रत्नाप्पाण्णांना ओळखले जाते. १६ संस्थाने विलीनीकरणाचा त्यांना मान मिळाला. कौन्सिल ऑफ एज्युकेशन तसेच शहाजी लॉ कॉलेज, कॉमर्स कॉलेज, नाईट कॉलेज तसेच दादासो मगदूम मास्तर स्मारक समितीतर्फे ज्युनि. कॉलेज, हायस्कूल चालविले जातात.

सहकारी चळवळीतील त्यांचे योगदान फारच श्रेष्ठ आहे. श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना, लि. गंगानगर, इचलकरंजी, जनता बझार, सूत गिरणी, पिपल्स बँक इत्यादींच्या माध्यमाने त्यांनी जनतेची सेवा केली. राजकारण हा आण्णांच्या आवडीचा विषय, अनेक राजकीय संकल्पना त्यांनी जनतेला सोप्या भाषेत समजावून सांगितले आहे. लोकशाही, समाजवाद प्रादेशिकता, एकात्मता, स्वराज्य इत्यादी विषयीचे त्यांचे विचार महान आहेत. त्यांनी भूषविलेली विविध पदे आमदार, खासदार तसेच मंत्री म्हणून त्यांचा काळ फारच गाजला आहे. सध्या आजही ते शिरोळचे आमदार आहेत. शिरोळ व हातकणंगले तालुक्यात त्यांचे वर्चस्व अनेकवेळा सिध्द झाले आहे. आजही ते वर्चस्व टिकून आहे. सध्या परवाच झालेली श्री पंचगंगेची निवडणूक बिनविरोध झाली. विरोधकांनी निवडणुकीत माघार घेतली.

आण्णांना कोल्हापूर महानगरपालिकेचे "मानपत्र" मिळाले आहे. पुणे विद्यापीठाची "डि.लिट्" मिळाली आहे. भारत सरकारने "पद्मश्री" हा किताब दिला आहे. आण्णांची राज्यघटनेवर स्वाक्षरी आहे. असे नेतृत्व

कोल्हापूर जिल्ह्यास लाभले. कोल्हापूर जिल्ह्याच्या मातीचे सोने झाले, असे नेतृत्व उदयोन्मुख तरुणांना मार्गदर्शकच ठरेल.

"डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार आणि राजकीय नेतृत्व" हा अभ्यास करण्यापूर्वी जसे आपण ह्या प्रकरणामध्ये आण्णांचे व्यक्तिमत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न केला तसेच पुढील प्रकरणामध्ये आपण रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे "शेतकऱ्यासाठी लढे, मोर्चे आणि भूमिगत चळवळीतील कार्य" या विषयी अभ्यास केलेला आहे.

.....

प्रकरण पहिले

संदर्भग्रंथ


१. पाक्षिक रूद्रवाणी - ऑक्टोबर, १९९४, अंक ९-१०, संपादक - जीवन किर्लोस्कर, रूद्रवाणी कार्यालय-४९९ रास्ता पेठ, पुणे-११, पान नं. ३७.

२. उपरोक्त, पान नं. ३७.

३. दैनिक शिवनेर, दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार वाढदिवस, पुरवणी - १५ सप्टेंबर, १९९४, संपादक - विश्वनाथ वाबळे, पान नं. १.

४. उपरोक्त, पान नं. ७.

५. आमचा प्रतिनिधी, सप्टेंबर, १९९३, संपादक - प्रकाश पाययुडे, पान नं. १७.

६. पाक्षिक रूद्रवाणी, सप्टे./ऑक्टो., १९९३, अंक ७ ते १०, संपादक - जीवन किर्लोस्कर, पान नं. ३७.

७. भातमारे दत्ता - पंचगंगेचा दीपस्तंभ, गजानन प्रिंटिंग प्रेस, मिरज, प्रथमावृत्ती, १९९४, पान नं. ३९.

८. दै. शिवनेर, दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार वाढदिवस, पुरवणी, १५/९/१९९४, पान नं. ७.

९. दिव्यध्वनी विशेषांक, सप्टेंबर, १९९३. संपादक - डॉ. कुलभूषण लोखंडे, पान नं. ४७.

१०. आमचा प्रतिनिधी, सप्टेंबर, १९९३, पान नं. १७ ते १८.

११. भातमारे दत्ता, पंचगंगेचा दीपस्तंभ, पान नं. ४१.
१२. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ३८.
१३. उपरोक्त, पान नं. ३८.
१४. भातमारे दत्ता, पंचगंगेचा दीपस्तंभ, पान नं. ४१.
१५. उपरोक्त, पान नं. ४१.
१६. उपरोक्त, पान नं. ४१.
१७. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ३८.
१८. साप्ताहिक अमरज्योत, १९७६, संपादक - एम्.आर. उलेंगे,
१९. पान नं. १८.
१८-अ बिरोजे भाऊसाहेब, अमृत महोत्सव गौरवगाथा, १९८४, पान नं. ७३.
१९. अमृतमहोत्सव गौरवग्रंथ, १५ सप्टेंबर, १९८४,
कार्यकारी संपादक - प्रा. दुष्यांत कुंभार, पान नं. ३०.
२०. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ३८.
२१. अमृत महोत्सव गौरवग्रंथ, १५ सप्टेंबर, १९८४, पान नं. २५.
२२. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ३९.
२३. उपरोक्त, पान नं. ३९.
२४. उपरोक्त, पान नं. ४०.
२५. उपरोक्त, पान नं. ४०.
२६. उपरोक्त, पान नं. ४०.
२७. उपरोक्त, पान नं. ४०.
२८. नवरत्न ७७, सप्टेंबर, १९८६, कार्यकारी संपादक - श्री हिंदुराव वाडे,
पान नं. ६२.
२९. अमृत महोत्सव, गौरवगाथा, १९८४, संपादक - विजय जगताप,
पान नं. ५३.
३०. करवीरचा क्रांतीवीर - दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार गौरवग्रंथ,
१९८५, प्रकाशक - बाळासाहेब धामणकर , पान नं. १९.

३१. अमृत महोत्सव गौरवगाथा, १९८४, पान नं. ७४.

३२. करवीरचा क्रांतीवीर, १९८५, पान नं. १९.

३३. उपरोक्त, पान नं. १९.

३४. उपरोक्त, पान नं. १९.

३५. उपरोक्त, पान नं. १९.

३६. उपरोक्त, पान नं. ३७.

३७. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ४०.

३८. दे. सागर, दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार गौरव पुरवणी, १९८४, संपादक - निशिकांत माधव जोशी, पान नं. १४.

३९. अमृत महोत्सव गौरव ग्रंथ, १५ सप्टेंबर, १९८४, पान नं. २६.

४०. उपरोक्त, पान नं. २७.

४१. उपरोक्त, पान नं. २८.

४२. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ४१.

४३. उपरोक्त, पान नं. ४१.

४४. उपरोक्त, पान नं. ४१.

४५. उपरोक्त, पान नं. ४१.

४६. उपरोक्त, पान नं. ४१.

४७. उपरोक्त, पान नं. ४२.

४८. उपरोक्त, पान नं. ४२.

४९. उपरोक्त, पान नं. ४२.

५०. उपरोक्त, पान नं. ४२.

५१. उपरोक्त, पान नं. ४२.

५२. उपरोक्त, पान नं. ४२.

५३. उपरोक्त, पान नं. ४२.

५४. उपरोक्त, पान नं. ४२.

५५. रत्नकुंभ - कौन्सिल ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर, १९८५, पान नं.१.

५६. उपरोक्त, पान नं. २.

५७. उपरोक्त, पान नं. २.

५८. उपरोक्त, पान नं. २.

५९. उपरोक्त, पान नं. २.

६०. उपरोक्त, पान नं. ४.

६१. उपरोक्त, पान नं. ५.

६२. ३५ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४,
कै. दादासो रामचंद्र मगदूम मास्तर स्मारक समिती का। सांगाव,
ता. कागल, जि. कोल्हापूर, मुखपृष्ठ-१.

६३. उपरोक्त, पान नं. १.

६४. श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी,
३८ वा वार्षिक अहवाल, १९९३-९४, पान नं. ४.

६५. पाक्षिक रूद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ४५.

६६. ३८वा वार्षिक अहवाल, १९९३-९४, श्री. पंचगंगा सहकारी साखर
कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी, पान नं. ९.

६७. उपरोक्त, पान नं. २.

६८. उपरोक्त, पान नं. २.

६९. उपरोक्त, पान नं. ४६.

७०. ३३वा वार्षिक अहवाल, १९९४-९५, कोल्हापूर जनता सेंट्रल को-ऑप.
कंझ्युमर्स स्टोअर्स लि. कोल्हापूर, जनता बझार, पान नं. २.

७१. उपरोक्त, पान नं. २४.

७२. उपरोक्त, पान नं. ४.

७३. उपरोक्त, पान नं. २०.

७४. उपरोक्त, पान नं. २०.

७५. उद्‌घाटन स्मरणिका - कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लि. रत्नाप्पा कुंभारनगर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर, पान नं. ६.

७६. क्रीडा सहकार रत्न - श्री. गणपती विष्णू कुंभार, कार्यकारी संचालक यांचा लेख, पान नं. ११.

७७. उद्‌घाटन स्मरणिका - कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूतगिरणी लि. रत्नाप्पा कुंभारनगर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर, पान नं. २.

७८. क्रीडा सहकार रत्न - बी.एम्. दानोळे मॅनेजर यांचा लेख, पान नं.३९.

७९. आठवा वार्षिक अहवाल, १९६९-७०, दि पिपल्स को-ऑप. बँक लि. इचलकरंजी, पान नं. १.

८०. क्रीडा सहकार रत्न - बी.एम्. दानोळे मॅनेजर यांचा लेख, पान नं.३९.

८१. उपरोक्त, पान नं. ३९.

८२. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. ५३.

८३. उपरोक्त, पान नं. ५३.

८४. उपरोक्त, पान नं. ५३.

८५. उपरोक्त, पान नं. ५३.

८६. उपरोक्त, पान नं. ५३.

८७. आमचा प्रतिनिधी, सप्टेंबर, १९९३, पान नं. ४६.

८८. आमदार रत्नाप्पा कुंभार - जीवन कार्याचे टाचन, अप्रकाशित भाग.

८९. पाक्षिक रुद्रवाणी - ऑक्टोबर, १९९४, पान नं. २३.

९०. उपरोक्त, पान नं. ३४.

९१. युगारंभ, १९९५, संपादक - मधु रावकर, (मुखपृष्ठ नं. १)

९२. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, मुखपृष्ठ नं. १

१३. युगारंभ, १९९५, पान नं. ९.

१४. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४, पान नं. २५ ते २६.

१५. उपरोक्त, पान नं. २६ ते २९.

१६. उपरोक्त, पान नं. २९.

१७. पाक्षिक रुद्रवाणी, ऑक्टोबर, १९९४,
कुमार गारगोटे यांचा लेख, पान नं. २९ ते ३३.

......

12918